३३वा सामना

मुंबई इंडियन्स् वि. सनरायजर्स हैद्राबाद

वेळ : ७.३० वा. स्थळ : मुंबई

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड



सोलापूर शहराचे तापमान

कमाल तपमान ४२.२

किमान तपमान २७.०

www.surajyadigital.com । गुरुवार, दि. १७ एप्रिल २०२५ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : १९८ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८


# मोठ्या भावाचा चाकूने भोसकून खून

## ● सांगोल्यातील चिंचोलीमधील थरार...

## ● रागाच्या भरात लहान भावाचा प्रताप

सांगोला/प्रतिनिधी

**सांगोला तालुक्यातील चिंचोली गावातील एका पेट्रोल पंपाजवळ बुधवारी सकाळी मोठा थरार घडला. लहान भावाने चाकूने भोसकून सख्ख्या मोठ्या भावाचा निर्घृण खून केला. या प्रकरणी लहान भाऊ तुषार याला पोलिसांनी अटक केली आहे. कार्तिक नामदेव यादव (वय २८) असे खून झालेल्या भावाचे नाव आहे. वडील नामदेव यादव यांनी या प्रकरणी सांगोला पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. कार्तिक हा दारू पिऊन घरातल्या सगळ्यांना शिवीगाळ करायचा. त्याचा राग आल्याने तुषार याने हा प्रताप केला.**



मयत कार्तिक यादव



चिंचोली गावात नामदेव यादव यांचे कुटुंब राहाते. नामदेव यांच्यासह पत्नी नंदा यादव, मोठा मुलगा कार्तिक (वय २८), लहान मुलगा तुषार (वय २५) असे एकत्र राहावयास असून वडिलोपार्जित शेती व मजुरी यातून येणाऱ्या उत्पन्नातून यादव हे आपली उपजीविका भागवतात. त्यांचा मोठा मोठा मुलगा कार्तिक याला दारूचे व्यसन होते. दारू पिऊन तो वारंवार आई व वडिलांना शिवीगाळ करायचा. ही त्याची कृती लहान भाऊ तुषार याला सहन होत नव्हती. तुषार हा प्रखरतेने त्यास विरोध करीत असे. त्यातून त्यामधून दोघांमध्ये वारंवार शिवीगाळ व अरेरावीची भांडणे होत असे. वडिलांनी दोघांनाही अनेक वेळा समजावून सांगितले पण कार्तिकच्या वर्तनात बदल झाला नाही.

बुधवारी सकाळी पावणे अकरा वाजण्याच्या सुमारास कार्तिक आणि तुषार यांच्या लाथाबुक्क्यांनी मारहाण सुरू होती. नामदेव यांचे मेव्हणे विकास इंकळ यांनी हा प्रकार पाहिल्यानंतर लागलीच ही खबर फोनवर नामदेव यांना दिली. सर्वजण घटनास्थळी निघाल्यानंतर तुषार हा वाटेतच वडिलांना भेटला.

दरम्यान तुषार हा तेथून राहते घराकडे निघाला जाताना कार्तिक यास म्हणाला की, तू आई-वडिलांना सारख्या शिव्या देतो, थांब आता तुला बघून घेतो असे म्हणाला व रागात घरी निघाला. त्यानंतर काही वेळाने कार्तिक हा पेट्रोल पंपावरून त्याच्या घराकडे गेला होता. कोणतीही अप्रिय घटना होवू नये म्हणून वडील, उत्तम बेहरे, राहुल होवाळ हे पेट्रोल पंप येथुन त्यांचे घराकडे निघाले. अंदाजे १०० मीटर आत गेल्यानंतर मनोहर नामदेव घाडगे यांचे शेतालगतच तषार याच्या हातामध्ये धारदार चाकूसारखे रक्ताने माखलेले हत्यार दिसले. त्याचवेळी तुषार हा वडिलांना म्हणाला की, मी कार्तीक याचा भोसकून मर्डर केला आहे व पंपासमोरच्या रोडने चालत गेला. वडिलांसह इतर काहीजण पुढे गेल्यावर विहिरीच्या भराव्याच्या आड बाजूला कार्तिक हा रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. त्याला तत्काळ उपचाराकामी सांगोला सरकारी दवाखान्यात आणले असता उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला.

वडील व इतर नातेवाईक रूग्णालयात गेल्यानंतर कार्तिकचा रक्ताच्या थारोळ्यातील मृतदेह पाहून एकच हंबरडा फोडला. कार्तिकचे कपडे रक्ताने माखलेले होते. त्याच्या डाव्या बाजूच्या बगलेमध्ये जखम होवून त्यामधून रक्त येत असल्याचे दिसले.

# सोलापूर बाजार समितीच्या रिंगणात ७० उमेदवार; कल्याणशेट्टी-देशमुखांच्या पॅनेलमध्ये होणार लढत

## माने, हसापुरे, मार्तंडे, देशमुख मैदानात; साठेंची माघार

सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर कृषि उत्पन्न बाजार समितीची निवडणूक रंगतदार होणार आहे. आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली सिद्धेश्वर शेतकरी विकास पॅनेलने १५ उमेदवार जाहीर केले तर त्या विरोधात आ. सुभाष देशमुख यांच्या नेतृत्वाखाली सिद्धेश्वर बाजार समिती परिवर्तन पॅनेलचेही १५ उमेदवार जाहीर झाले आहेत. या निवडणुकीसाठी शेवटच्या दिवशी ३२१ उमेदवारांनी आपले अर्ज माघारी घेतल्याने ७० उमेदवार मैदानात उतरले आहे. यामध्ये माजी आ. दिलीप माने, सुरेश हसापुरे, अविनाश मार्तंडे, मनिष देशमुख, रामप्पा चिवडशेट्टी आदी दिग्गज नेते मैदानात उतरल्याने निवडणुकीची चुरस वाढली आहे.

सोलापूर जिल्ह्यातील बहूचर्चित सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या १८ संचालक मंडळाची निवडणूक प्रकियेसाठी ३२१ उमेदवारांनी अर्ज सादर केले होते. १६ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत अर्ज माघार घेण्याची अंतिम मुदत होती. ३२१ उमेदवारांनी आपले अर्ज माघारी घेतल्याने ७० उमेदवार मैदानात उतरले आहे.

माघार घेतलेल्या उमेदवारातून काका साठे गटातून सहा, जनकल्याण पतसंस्थेचे अध्यक्ष राजेंद्र हजारे, मनोज साठे, अमोल शिंदे, जुबेर शेख, शालिवाहन माने, सचिन गुंड, राजू सुपाते, काशिनाथ कदम, भारत जाधव, किसन जाधव आदींचा समावेश आहे. काका साठे यांनीही माघार घेतली.

सकाळी ११ वाजल्यापासून अर्ज माघारी घेण्याच्या प्रकियेला सुरुवात झाली. दुपारी १ वाजेपर्यंत उपनिबंधक कार्यालयात शुकशुकाट होता. त्यानंतर हळूहळू गर्दी वाढायला सुरुवात झाली. नियमानुसार २ ते ३ यावेळेस उपनिबंधक कार्यालय हाऊसफुल्ल झाल्याचे दिसून आले. ३ वाजेपर्यंत जे उमेदवार आत आले त्याचेच माघार अर्ज घेण्यात आले. लक्ष्मीबाई व्यापारी गटातून मतदारसंघातून वैभव बरबडे, अहमद चौधरी यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

### शेळके आऊट तर गणेश वानकर इन

उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी बऱ्याच राजकीय घडामोडी घडल्या. आमदार सचिन कल्याणशेट्टी, दिलीप माने, सुरेश हसापुरे हे प्रमुख नेते दिवसभर शासकीय विश्रामगृहावर ठाण मांडून होते. पॅनलमध्ये जाण्यासाठी अनेक नेत्यांनी दिवसभर प्रयत्न केले. माने यांच्या पॅनेलमधून बाळासाहेब शेळके यांचे नाव कट झाले. हे कळताच त्यांनी शासकीय विश्रामगृहातून काढता पाय घेतला. शेवटच्या क्षणी दिवसभराच्या वेटिंगनंतर श्रीशैल नरोळे यांचा पॅनलमध्ये समावेश झाला. शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वानकरही माने यांच्या पॅनेलमध्ये आले आहेत.

### असे आहे सिध्देश्वर शेतकरी विकास पॅनल

सोसायटी मतदार संघ - सर्वसाधारण : दिलीप माने-(तिऱ्हे), सुरेश हसापुरे- (निंबर्गी), राजशेखर शिवदारे-(इंगळगी), श्रीशैल नरोळे- (लिंबीचिंचोळी), उदय पाटील-(संजवड), प्रथमेश पाटील-भंडारकवठे, नागण्णा बनबोडे-(नांदणी), सर्वसाधारण महिला: इंदूमती अलगोंडा-(वडकबाळ), अनिता विभूते-(बोरामणी), भटक्या जाती जमाती:सुभाष पाटोळे-होटगी स्टेशन),ओबीसी इतर मागासवर्गीय- अविनाश मार्तंडे-(मार्डी)-, ग्रामपंचायत सर्वसाधारणः ग्रामपंचायतः संगमेश पाटील- (लवगी), गणेश वानकर-(देगाव) रविंद्र रोकडे-(बोरामणी), सुनील कळके-मुस्ती.





### असे आहे सिध्देश्वर बाजार समिती परिवर्तन पॅनल

ग्रामपंचायत - सर्वसाधारण - मनिष देशमुख, रामप्पा चिवडशेट्टी, ग्रामपंचायत- अनुसूचित जाती/जमाती अतुल गायकवाड, होटगी, ग्रामपंचायत, आर्थिक दुर्बल घटक- यतीन शहा भंडारकवठे, सहकारी संस्था - सर्वसाधारण-चन्नगोंडा हविनाळे बरुर, रमेश आसबे, अकोले मंद्रुप, भिमाशंकर बबलेश्वर भंडारकवठे, आप्पासाहेब पाटील वडकबाळ, बाळासाहेब पाटील विंचूर, संग्राम पाटील कौठाळी, धनेश अचलारे बोरामणी, सहकारी संस्था - महिला राखीव- निलाबाई पुजारी वडकबाळ, पुष्पा गुरव हणमगाव, सहकारी संस्था - इतर मागासवर्ग- सुभाष तेली, विमुक्त जाती, भटक्या जमाती-संदीप टेळे.

आ. सुभाष देशमुख यांच्या गटातही शेवटच्या दिवशी नाट्यमय घडमोडी घडल्या. परिवर्तन पॅनलमध्ये युवा नेते मनीष देशमुख हा युवा चेहरा सर्वांचे लक्ष वेधून घेणारा ठरला. विधानसभा निवडणुकीवी वेळी सुभाष देशमुख यांच्या उमेदवारीला विरोध करणारे माजी संचालक आप्पासाहेब पाटील हे सुद्धा आता सुभाष देशमुख यांच्या पॅनलमध्ये सहभागी झाले आहेत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



अजून किती झाडं लावायची?

संगम श्री डे
577-90-550

संगम श्री नाईट
367-63-346

कल्याण
169-62-570

मुंबई
155-13-120

# विजेचा शॉक बसून तरुण शेतकऱ्याचा मृत्यू

## धक्का बसून दोघे शेतकरी जखमी, विद्युत मंडळातील तिघांवर गुन्हा दाखल

मोहोळ/प्रतिनिधी

**शॉर्टसर्किटमुळे शेतातील विद्युत डीपीला आग लागली. याची माहिती त्वरित फोनवरून विद्युत मंडळाच्या कार्यालयास कळविण्यात आली. मात्र वेळीच दखल न घेतल्यामुळे शेटफळमध्ये एक तरुण शेतकरी शॉक बसून मरण पावला. तर अन्य दोघे जखमी झाले. मनोज विलास डंके (वय २५ रा.शेटफळ) असे मयत झालेल्या विवाहित तरुण शेतकऱ्याचे नाव आहे. तर आबा खडके (वय ६०) आणि अरुण भोसले (वय ३६ रा.शेटफळ) अशी जखमींची नावे आहेत.**





ही भयानक घटना शेटफळ (ता. मोहोळ) येथे मंगळवारी सकाळच्या सुमारास घडली. आगीची माहिती देऊन देखील विद्युत मंडळाने दाखवलेल्या हलगर्जीपणामुळे शेतकऱ्याचा मृत्यू झाला. त्यास विद्युत मंडळ जबाबदार आहे. अशी फिर्याद मृत्यूच्या दाढेतून बचावलेल्या जखमी शेतकऱ्याने मोहोळ पोलिसात दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी शेटफळ येथील विद्युत मंडळाचे ऑपरेटर आणि अन्य दोघे कर्मचारी अशा तिघांवर मृत्यूस कारणीभूत ठरल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणी मोहोळच्या पोलिसांनी शेटफळ विद्युत कार्यालयातील ऑपरेटर कल्याण शेट्टी, पुरुषोत्तम ढेरे आणि राठोड (तिघे रा. शेटफळ कार्यालय) या तिघांवर गुन्हा दाखल झाला आहे. या संदर्भात जखमी झालेले अरुण अर्जुन भोसले (वय ३६ रा. शेटफळ) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली.

मंगळवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास ते घरात असताना जवळ असलेल्या विजय खडके यांच्या शेतातील विद्युत डीपीतून आवाज आल्याचे समजले.

त्यानंतर ते घटनास्थळी गेले असता तेथे विलास डंके, आबासाहेब खडके, नामदेव खडके, सिद्धू खडके हे सगळेजण होते. डीपीला आग लागल्याचे पाहून तिघांनी मिळून ती आग शमवली.

तेंव्हा जवळच असलेल्या बांधावर विजेच्या तारा तुटून पडल्याचे दिसून आले. तर त्याला बाजूलाच मनोज डंके हे खाली पडल्याचे दिसून आले. तेथे जाऊन त्यास वाचवण्याचा प्रयत्न केले असता त्याला नामदेव खडके आणि अरुण भोसले यांना देखील शॉक बसून ते चिकटले होते. त्यावेळी आबा खडके यांनी त्वरित जाऊन डीपीतील फ्युज काढला. त्यावेळी भोसले आणि खडके यांची विद्युत तारांतून सुटका झाली. बेशुद्ध झालेल्या मनोज डंके यांना त्वरित मोडनिंब येथील रुग्णालयात नेले असता तेथील वैद्यकिय अधिकाऱ्यांनी त्याला पंढरपूर येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे डंके यांना पंढरपूर येथे नेण्यात आले. उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.

> त्यावेळी सोबत असलेल्या शेतकऱ्यांनी मनोज डंके यांच्या खिशातील मोबाईल तपासून पाहिले असता त्यांनी दुर्घटनेची माहिती विद्युत मंडळाचे ऑपरेटर कल्याण शेट्टी आणि इतर कर्मचाऱ्यांना कळवल्याचे दिसून आले. डीपीतील आग आणि विद्युत तारा तुटल्याची माहिती मिळून देखील कर्मचारी घटनास्थळी आले नाही किंवा कार्यालयातून विद्युत पुरवठा खंडित केला नाही. त्यामुळे एका तरुण शेतकऱ्याच्या जीव गमावून दोघे जखमी झाले. या दुर्घटनेला विद्युत मंडळाचे कर्मचारीच जबाबदार असल्याची फिर्याद अरुण भोसले यांनी पोलिसात दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी विद्युत मंडळाच्या तिघा कर्मचारी विरुद्ध गुन्हा दाखल केला. मात्र त्यांना अद्याप अटक केली नाही. पुढील तपास फौजदार चव्हाण करीत आहेत.

## आळगी येथे गळफास घेऊन इसमाची आत्महत्या

**सोलापूर** : आळगी (ता.अक्कलकोट) येथे राहणाऱ्या एका ३४ वर्षीय इसमाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. भीमाशंकर पंडित मांग (वय ३४ रा. आळगी, ता.अक्कलकोट) असे मयताचे नाव आहे. त्याने रविवारी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास राहत्या घरात छताच्या पंख्याला साडीच्या सहाय्याने गळफास घेतला होता. त्याला पत्नीने फासातून सोडवून खाजगी रुग्णालयात उपचार करून बेशुद्धावस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. उपचारा दरम्यान तो मंगळवारी रात्री मयत झाला. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही.

## मुलाच्या भांडणातून लाकडाने मारहाण

**सोलापूर** : लहान मुलांच्या भांडणातून लाकूड आणि लाथाबुक्क्यांनी केलेल्या मारहाणीत पती-पत्नी जखमी झाले. ही घटना लक्ष्मी मार्केट परिसरातील मार्कंडेय मंदिराजवळ मंगळवारी रात्रीच्या सुमारास घडली. अमर ज्ञानेश्वर सुरवसे (वय ३८) आणि त्यांची पत्नी कांचन (वय ३३ दोघे रा. सिद्धेश्वर पेठ) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मंगळवारी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास लक्ष्मी मार्केट येथील मार्कंडेय मंदिराच्या पाठीमागे त्यांना लहान मुलाच्या भांडणातून मुकुंद सुरवसे आणि कविता सुरवसे या दोघांनी मारहाण केली. अशी नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली आहे.